नि.दरखास्त क्र.१०४/२०१३
गयाबाई वि. सरकार

<u>आदेश नि.१० खाली</u>

१. प्रस्तुतचा अर्ज धनकोचे वारस यांनी दाखल केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, या प्रकरणातील धनको गयाबाई तान्हाजी काटेकर हिचा मृत्यु दि.२१/०१/२०१४ रोजी झाला आहे. त्यामुळे त्यांनी मयत धनको गयाबाई तान्हाजी काटेकर हिचे वारस म्हणुन प्रकरणामध्ये त्यांना समाविष्ट करून घेण्याची विनंती केली आहे.

२. वारंवार संधी देवुन देखिल ऋणको यांनी सदर अर्जाला त्यांचा खुलासा दिला नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज ऋणकोच्या खुलाशाविना आदेशासाठी घेण्यात आला आहे.

३. धनको तर्फे त्यांचे विधिज्ञाचा युक्तीवाद ऐकला.

४. अर्जदार यांनी ते मयत धनको गयाबाई तान्हाजी काटेकर हिचे वारस असल्याचे कथन केले आहे. मयत धनको गयाबाई यांच्या वारसांनी सदरचा अर्ज शपथपत्रावर दिलेला आहे. तसेच अर्जासोबत त्यांनी कागदपत्राची यादी नि.१४ खाली धनको गयाबाई तान्हाजी काटेकर हिचे मृत्यु प्रमाणपत्र दाखल केले आहे. तसेच सरपंच ग्रामपंचायत तोरनाळा यांनी दिलेला वारसाचा दाखल दाखल केला आहे. त्या वारस दाखल्यामध्ये ताराबाई घमराव काकडे आणि मंदाबाई संजय मुठाळ हया मयत गयाबाई हिच्या मुली असल्याचे दर्शविले आहे आणि मुरलीधर तान्हाजी काटेकर हा तिचा मुलगा असल्याचे दर्शविले आहे. वरील सर्व बाबींवरून प्रथम दर्शनी अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत धनको गयाबाई हिचे वारस असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे त्यांना सदरच्या दरखास्तीमध्ये मुळ धनको गयाबाई हिच्या जागी तिचे वारस म्हणुन समाविष्ट करून घेणे आवश्यक ठरते. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज नि.१० मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार ताराबाई घमराव काकडे आणि मंदाबाई संजय मुठाळ हया मयत गयाबाई हिच्या मुली असल्याने आणि मुरलीधर तान्हाजी काटेकर हा मयत गयाबाई काटेकर हिचा मुलगा असल्याने त्यांना या प्रकरणामध्ये मयत धनको गयाबाई तान्हाजी काटेकर हिंचे वारस म्हणुन समाविष्ट होण्याची परवानगी देण्यात येत आहे.

स्वा

दि.१९/०८/२०१९

( एस.पी.शिंदे )

दिवाणी न्यायाधीश व.स्तर,वाशिम